**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मुकुंद गोविंद मोरे ..... **अपीलकर्ता**
घर नं.५६५, एम.आय.डी.सी.माळवाडी, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपसंचालक नगररचना, पुणे विभाग, पुणे,
नगररचना आणि मूल्य निर्धारण विभाग, पुणे विभाग, पुणे स.नं.७४/२, सहकारनगर, पुणे
..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक संचालक नगररचना, पुणे विभाग, पुणे,
नगररचना आणि मूल्य निर्धारण विभाग, कोल्हापूरशाखा, १०९२ बी, बिंदू चौक कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६६ /२००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक ७.४.२०१० |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मुकुंद गोविंद मोरे
घर नं.५६५, एम.आय.डी.सी.माळवाडी, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपसंचालक नगररचना, पुणे विभाग, पुणे, नगररचना आणि मूल्य निर्धारण विभाग, पुणे विभाग, पुणे स.नं.७४/२, सहकारनगर, पुणे श्रीमती साधना नाईक

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक संचालक नगररचना, पुणे विभाग, पुणे,
नगररचना आणि मूल्य निर्धारण विभाग, कोल्हापूर, १०९२ बिंदू चौक, कोल्हापूर श्री.मधुकर देवडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १२.८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक ३१.८.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक १०.९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक २८.१०.२००९ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

नगररचना योजनेच्या संदर्भात मागितलेली माहिती अपुरी व दिशाभूल करणारी दिली. रस्त्याबाबत न्यायालयाची स्थगिती असतानाही शासनाची मंजुरी मिळालेली व त्या संदर्भातील अन्य कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, कोल्हापूर, नगरररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, कोल्हापूर यांनी आपल्याला दिल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मुकुंद गोविंद मोरे यांनी केली.

श्री.मोरे यांनी मागितलेली सर्व माहिती त्यांना दिली. तसेच सबंधित अभिलेखाधील त्याना आवश्यक असलेल्या मूळ अर्जाव्यतिरिक्तच्या कागदपत्रांच्या प्रतीही दिल्या. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील अर्जाबाबत आपली हरकत राहिली नसल्याचे त्यांना लेखी दिले. त्यांच्या अर्जातील माहितीची मागणी स्पष्ट नसतानाही माहिती देण्याबाबतची योग्य कार्यवाही करण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना, कोल्हापूर, नगरररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, कोल्हा श्री.मधुकर देवडे व अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक नगररचना, पुणे विभाग, पुणे, नगरररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, पुणे विभाग, पुणे श्रीमती साधना नाईक यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्यास सर्व माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. रामचंद्र बळवंत मगदूम
मु.पो.चिखली, ता.कागल, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल — उत्तरवादी
ता. कागल, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल
ता. कागल, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६७ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ७.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल
ता. कागल, जि. कोल्हापूर श्री.एन. व्ही. कल्याणकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल
ता. कागल, जि. कोल्हापूर श्री. ए. ए. भाणसे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.७.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.८.२००९ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती प्राप्त झाली असून वेगळे म्हणणे मांडण्याची आवश्यकता वाटत नाही, असे अपीलकर्ता श्री. रामचंद्र बळवंत मगदूम यांचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल, ता. कागल श्री. एन. व्ही. कल्याणकर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.नामदेव बाबासाहेब खरात
नितीराज निवास, निरा,ता.पुरंदर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कृषी विकास अधिकारी,
जिल्हा परिषद सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६७/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम तारीख | दि.२५.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०४.०३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.०४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.०४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०३.०५.२००८ |
| ७ | **<u>मूळ अर्जान्वये केलेली मागणी</u> :-** दि.२९.१२.२००५ रोजी दाखल केलेल्या वैद्यकिय दाखल्याच्या अनुषंगाने माहिती. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.नामदेव बाबासाहेब खरात यांच्या या अपिलाचा समावेश दि.२५.११.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये करण्यात आला होता. त्यामध्ये अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी या तिन्ही घटकांमध्ये माहितीबाबत एकमत झाले नाही. तथापि, उपलब्ध कागदपत्रांच्या अवलोकनाअंती सदर प्रकरणी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा श्री.अंकुश बगाटे यांनी दि.०३.०५.२००८ रोजी दिलेला निर्णय योग्य असून कायम करण्यात येत आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

स्थळ : पुणे
दिनांक : 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर सिताराम कराळे
ज्ञानेश्वर, सर्व्हे नं.७/२, गाथा मंदिर रोड,
मु.पो.देहुगांव, ता.हवेली, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती हवेली, ता.हवेली, जि. पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,
श्री क्षेत्र देहूगाव, ता.हवेली,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती हवेली, ता.हवेली, जि. पुणे श्री.एस.आर.बोडरे

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,
श्री क्षेत्र देहूगाव, ता.हवेली,जि.पुणे श्री.एस.पी.खैरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०४.०२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०१.०५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.०३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर सिताराम कराळे यांनी मागितलेली माहिती विलंबाने मिळाल्याची तक्रार आयोगाकडील अपील अर्जात केली आहे. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, श्री क्षेत्र देहूगाव, ता.हवेली,जि.पुणे श्री.एन.पी.पावडे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती हवेली, ता.हवेली, जि. पुणे श्री.बी.टी.पवार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी अपीलकर्त्यास माहिती दिली असल्याचे सांगितले, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती हवेली, ता.हवेली, जि. पुणे श्री.एस.आर.बोडरे यांनी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

स्थळ : पुणे
दि. 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गुलाब सिताराम जाधव
४७/३, भावे सोसायटी, तावरे कॉलनी,
हॉटेल नवरत्नमागे, पुणे सातारा रोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खेड,
खेड तहसील कार्यालय, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खेड,
खेड तहसील कार्यालय, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९७१/पुणे+१३१८/२००९/पुणे +१३१६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गुलाब सिताराम जाधव
४७/३, भावे सोसायटी, तावरे कॉलनी,
हॉटेल नवरत्नमागे, पुणे सातारा रोड, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खेड,
खेड तहसील कार्यालय, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे श्री.दिगंबर रौंधळ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.१२.२००७ (अ.क्र.१९७१)<br>दि.२.७.२००९ (अ.क्र.१३१६)<br>दि.२८.५.२००९ (अ.क्र.१३१८) |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.१.२००८ (अ.क्र.१९७१)<br>दि.२.७.२००९ (अ.क्र.१३१६)<br>दि.९.६.२००९ (अ.क्र.१३१८) |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.२.२००८ (अ.क्र.१९७१)<br>दि.३.७.२००९ (अ.क्र.१३१६)<br>दि.३०.६.२००९ (अ.क्र.१३१८) |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.३.२००८ (अ.क्र.१९७१)<br>दि.२०.७.२००९ (अ.क्र.१३१६) |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.११.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या खात्याच्या विभाजनाबाबत फसवणूक झाली असून आणेवारीबाबत फेरफार उतारा झालेला नाही. मंडल अधिकारी अथवा तहसीलदार यांची त्याला मंजुरी घेतलेली नाही व सदर आणेवारी रद्द करण्यासाठी दिलेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात आलेली नाही. गावकामगार तलाठी यांनी खोट्या नोंदी केल्या असून त्याबाबतची माहिती, तसेच सन १९८९ ते २००१ पर्यंतच्या गाव कामगार तलाठी व मंडल अधिकाऱ्यांची नावे दिली जात नाहीत. ही माहिती मिळावी, विभाजन रद्द करून मूळ मालकाची नावे ७/१२ उताऱ्याला दाखल करावी व त्यांच्या संमतीने फाळणीबारा करावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.गुलाब सिताराम जाधव यांनी केली.

संबंधित प्रकरण तीन भावांमधील असून एका भावाने हिस्सा विकला व फाळणीबारा न होता तलाठ्याने पोटहिस्से केले आहेत. वहिवाटीबाबतचा निर्णय तत्कालीन तहसीलदारांनी प्रत्यक्ष

जागेवर पाहणी करून दिलेला आहे. या संदर्भात उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अपील प्रलंबित आहे. याबाबतची माहिती श्री.जाधव यांना देण्यात आली आहे. नोंदी रद्द करण्याबाबतची त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खेड, तहसीलदार कार्यालय, खेड, ता.खेड, जि.पुणे श्री.दिगंबर रौंधळ यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२०.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेशचंद्र पुरूषोत्तम पाथरकर
बंगला नं.१०, पद्मप्रकल्प, निलमणी हौसिंग सोसायटी,
स्टेट बँक कॉलनी, राजीवनगर, नाशिक — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेशचंद्र पुरूषोत्तम पाथरकर
बंगला नं.१०, पद्मप्रकल्प, निलमणी हौसिंग सोसायटी,
स्टेट बँक कॉलनी, राजीवनगर, नाशिक

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बी.बी.वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एस.के.गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.५.३.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.११.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण जमीन मोजणी प्रकरणातील माहिती मागणारा अर्ज दि.२२.११.२००७ रोजी केला व माहिती दि.२७.११.२००८ रोजी मिळाली. दिलेल्या सत्यप्रती आणि मूळ कागदपत्रे यातील जबाब, केलेला पंचनामा व अधिकाऱ्यांचा अहवाल यात फरक आहे. आपल्याला सर्व माहिती मिळाली असून ती विलंबाने देणाऱ्या अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुरेशचंद्र पुरूषोत्तम पाथरकर यांनी केली.

श्री.पाथरकर यांनी अर्ज केला, तेव्हा जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे हे पद रिक्त होते. दि.२४.१२.२००७ ते दि.१२.६.२००८ या काळात या पदाचा अतिरिक्त कार्यभार आपल्याकडे सोपविण्यात आला. त्याआधी श्री.डी.एम.शिंदे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार होता, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एस.के.गायकवाड यांनी नमूद केले.

आपण दि.११.६.२००८ रोजी पदभार स्वीकारला. श्री.पाथरकर यांना आठ दिवसांत माहिती नि:शुल्क पुरवावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे श्री.बी.बी.वानखेडे यांनी दि.२८.२.२००८ रोजी दिले. त्यानुसार दि.५.३.२००८ रोजी श्री.पाथरकर यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली होती. त्यानंतर दि.२५.११.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील चर्चेनंतर मूळ प्रकरणातील अभिलेख अवलोकनासाठी त्यांना

उपलब्ध करून देऊन हवी असलेली माहिती दिली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एस.के.गायकवाड यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्री.पाथरकर यांची मूळ तक्रार अतिक्रमणविषयक असून त्याबाबतची प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि श्री.पाथरकर यांनी अर्ज केला, तेव्हा जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे असलेले श्री.डी.एम.शिंदे व त्यांच्यानंतर जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे असलेल्या श्रीमती प्र.मो.लोहोकरे यांनी मूळ अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत लेखी खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांनी त्याच दिवशी संबंधितांना हे आदेश अवगत केले. त्यानुसार श्री.शिंदे यांनी दि.१९.३.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. आपली कायम नियुक्ती तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, शिरूर या पदावर असताना अत्यंत अल्प कालावधीसाठी (दि.२९.११.२००७ ते २३.१२.२००७) तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर या पदाचा अतिरिक्त कार्यभार आपल्याकडे होता. श्री.पाथरकर यांचा अर्ज त्यापूर्वीच दाखल झालेला असतानाही संबंधित संकलनाचे काम पाहणाऱ्या लिपिकाने या अर्जाची कोणत्याही प्रकारे आपल्याला कल्पना दिली नाही व अर्ज आपल्याकडे सादर केला नाही. त्यामुळे माहिती देण्यास झालेल्या विलंबाला संबंधित कर्मचारी जबाबदार आहेत, असे श्री.शिंदे यांनी खुलाशात म्हटले आहे.

श्रीमती लोहोकरे यांनी दि.११.३.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. श्री.पाथरकर यांचा अर्ज मुख्यालय सहाय्यक, तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर श्री.हजारे यांनी स्वीकारून नगरभूमापन लिपिक यांच्याकडे वर्ग केला. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडील सुनावणीच्या सूचनेच्या पत्रावरही श्री.हजारे यांनीच करिता म्हणून स्वाक्षरी केलेला मूळ अर्ज, अपिलाची तारीख, अपिलाचा निर्णय यातील कोणतीही बाब श्री.हजारे

यांनी आपल्या निदर्शनास आणली नाही. तसेच त्याबाबतचा कोणताही पत्रव्यवहार आपल्या स्वाक्षरीसाठी सादर केला नाही. दि.५.३.२००८ रोजी श्री.हजारे यांनीच स्वत:च्या स्वाक्षरीने श्री.पाथरकर यांना उत्तर पाठविल्याचे धारिकेवरून दिसते. अतिरिक्त कार्यभार असताना व वरीलप्रमाणे कोणतीही बाब आपल्या निदर्शनास आणलेली नसल्यामुळे आपल्याला कार्यवाही करता आली नाही, झालेल्या विलंबाला श्री.हजारे हेच व्यक्तिश: जबाबदार आहेत, असे श्रीमती लोहोकरे यांनी खुलाशात म्हटले आहे.

श्री.शिंदे व श्रीमती लोहोकरे यांचा वरील खुलासा लक्षात घेता, तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांनी माहिती मागणीबाबतच्या अर्जावर योग्य कार्यवाही केलेली नाही, असे दिसते. याबाबत चौकशी करून जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाणे आवश्यक आहे. संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.डी.एम.शिंदे व श्रीमती प्र.मो.लोहोकरे हे विलंबाला जबाबदार नसल्याचे त्यांच्या खुलाशावरून व सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर कार्यालयातील लिपिक श्री.हजारे, संकलनाचे काम पाहणारे लिपिक यांच्याबाबत श्रीमती लोहोकरे व श्री.शिंदे यांनी खुलाशात केलेले निवेदन लक्षात घेता त्याबाबतची चौकशी करून संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांनी दि.२५.५.२०१० पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर भीमा मगदूम
मु.पो.मनवाड, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर,
जि.कोल्हापूर — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,
मनवाड वि.का.स. सेवा संस्था मर्या., मनवाड,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर भीमा मगदूम
मु.पो.मनवाड, ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर,
जि.कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे तर्फे प्रतिनिधी श्री.एल.टी.भोसले

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,
मनवाड वि.का.स. सेवा संस्था मर्या., मनवाड,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.रमेश भिमराव कलगोंडा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०९.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०७.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.०२.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सात दिवसांत निःशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा सचिव, मनवाड वि.का.स. सेवा संस्था मर्या., मनवाड,ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.रमेश भिमराव कलगोंडा यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे कबूल करुनही सर्व माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शंकर भीमा मगदूम यांनी केली.

अपीलकर्त्याने संस्थेकडे कोणताही पत्रव्यवहार केला नाही. कार्यालयात तोंडी माहिती मागितली. त्यानुसार त्यांना सर्व माहिती दिली. रजिस्टर टपालाने माहिती दिली असून त्याची पोच संस्थेकडे आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, मनवाड वि.का.स. सेवा संस्था मर्या., मनवाड,ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.रमेश भिमराव कलगोंडा यांनी नमूद केले.

संस्थेला सभासदांच्या कर्जमाफीपोटी शासनाकडून मिळणारी मदत लक्षात घेता संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ लागू आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,सहकारी संस्था, कोल्हापूर,जि.कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांच्या तर्फे प्रतिनिधी श्री.एल.टी.भोसले यांनी निवेदन केले.

अपीलकर्त्याला माहिती दिल्याबाबतची रजिस्टर टपालाची पोच आयोगाला सादर करण्याचे मौखिक आदेश सुनावणीच्या वेळी दिले. सभासदांना पासबुके दिली नाहीत, वार्षिक सभेची नोटीस दिली जात नाही, या अपीलकर्त्याच्या तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दखलपात्र नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली.
२. अपीलकर्त्यास माहिती दिल्याची रजिस्टर टपालाची पोच जन माहिती अधिकारी तथा सचिव, मनवाड वि.का.स. सेवा संस्था मर्या., मनवाड,ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.रमेश भिमराव कलगोंडा यांनी आयोगास त्वरित सादर करावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अ.ज.इनामदार
श्री दिव्यदर्शन अपार्टमेंट, वीसे मळा, इच्छामणी गणपती
मंदिराशेजारी, कॉलेजरोड, जि.नाशिक — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक(प्रशासन), विशेष पोलीस
महानिरीक्षक, मोटर परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस
महानिरीक्षक, मोटर परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८५+३१२६ ते ३१३१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अ.ज.इनामदार
श्री दिव्यदर्शन अपार्टमेंट, वीसे मळा, इच्छामणी गणपती
मंदिराशेजारी, कॉलेजरोड, जि.नाशिक

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक(प्रशासन), विशेष पोलीस महानिरीक्षक,
मोटर परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एच.एस.पडवळ

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, विशेष प्रोलीस महानिरीक्षक, मोटर परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.ए.एल.पंडन | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपील क्र.१९८५ या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे दि.१५.७.२००९ रोजी पुन्हा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश केला गेला. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे या व अपीलकर्त्याच्या याच विषयाशी निगडित अन्य अपिलांची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

पोलीस वाहनांसाठी सुट्या भागाची खरेदी, वाहन दुरूस्ती, नियुक्त केलेले विक्रेते, कंपन्यांचे अधिकृत प्रतिनिधी असल्याबाबतचा पुरावा आदी माहिती वारंवार मागणी करूनही मोटार परिवहन विभागाकडून दिली जात नाही. विक्रेते कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी नसताना त्यांना नियुक्त करून त्यांच्याकडून केलेली सुट्या भागाची खरेदी / वाहने दुरूस्ती यात निकृष्ट दर्जाचा माल वापरून वा अन्य प्रकारे मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला गेला असल्यामुळे ही माहिती दिली जात नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी चालू असून झेरॉक्स मशिन बंद असल्यासारखी तकलादू व खोटी कारणे पुढे करून माहिती नाकारून भ्रष्टाचार लपविला जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अ.ज.इनामदार यांनी केली.

श्री.इनामदार हे मोटार परिवहन विभागात पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. शासकीय सेवेत असताना वाहनाची सुटे भाग खरेदी, वाहन दुरूस्ती आदींमध्ये केलेल्या भ्रष्टाचार प्रकरणी

त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू आहे. या प्रकरणी दबाव आणण्यासाठी विविध स्वरूपाचे अर्ज व अपिले ते सातत्याने करीत असतात. श्री.इनामदार दि.१.११.२००८ पासून सेवानिवृत्त झाले असून माहितीच्या अधिकारात सन २००५ पासून जुन्या अभिलेखांची व न्यायप्रविष्ट प्रकरणांची माहिती सातत्याने मागत आले आहेत. सन १९९६ पासून आजतागायतची माहिती विविध अर्जांद्वारे त्यांनी मागितली असून आतापर्यंत माहितीच्या अधिकारातील ५८ अर्ज व ३० अपिले त्यांनी केली आहेत. वेळोवेळी त्यांना उत्तर देण्यात आले आहे. कार्यालयातील टंकलेखकांसह सुमारे ८० पदे रिक्त असून श्री.इनामदार यांनी मागितलेल्या स्वरूपात सर्व माहिती उपलब्ध नाही. त्यांनी समक्ष येऊन अभिलेख पाहून माहिती घ्यावी, असेही त्यांना वेळोवेळी कळविले आहे. परंतु ते येत नाहीत व माहिती दिली तरी त्यांचे समाधान होत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक(प्रशासन), विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटर परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.ए.एल.पंडन व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक(प्रशासन), विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटर परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एच.एस.पडवळ यांनी केले. संबंधित सर्व कागदपत्रे आता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ताब्यात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता त्याच-त्याच स्वरूपाची माहिती मागणारे अर्ज श्री.इनामदार सातत्याने करीत आहेत. त्यांना माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यातर्फे वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सुटे भाग खरेदीसाठी / दुरुस्तीसाठी नियुक्त केलेले २१ विक्रेते कोणत्या कंपन्यांचे अधिकृत विक्रते आहेत, हा तपशील दिला जाणे आवश्यक आहे. परंतु हे विक्रेते नेमणे योग्य की अयोग्य, वापरलेले सुटे भाग अधिकृत की बनावट, अशा स्वरूपाचे मुद्दे श्री.इनामदार यांनी अर्जात उपस्थित केले असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत अशा विचारणेचा समावेश होत नाही. तसेच अन्वयार्थ, अभिप्राय याची मागणी 'माहिती' म्हणून करता येणार नाही. नियुक्त केलेले विक्रेते कोणत्या कंपन्यांचे अधिकृत प्रतिनिधी आहेत, याची माहिती

अपीलकर्त्यास आठ दिवसात जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक(प्रशासन), विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटर परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नि:शुल्क पाठवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक(प्रशासन), विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटर परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.१०.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१९.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. भाऊसाहेब धोंडिबा गावडे
मु.पो.केंदूर, ता.शिरुर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी,**
विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१३ यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,**
विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१३ यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/०४/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/०८/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०/१०/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.५/०४/२०१० |
| ६ | **उपस्थिती**<br>श्री. भाऊसाहेब धोंडिबा गावडे<br>मु.पो.केंदूर, ता.शिरुर,<br>जि.पुणे<br><br>अपिलीय प्राधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी,<br>विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१३<br>श्री. दिलीप जगदाळे | |

| | |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,<br>विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१३ यांचे कार्यालय,<br>श्री.दिलीप ढमढेरे |
| ७ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी:-** आदर्शगांव योजनेअंतर्गत जलसंधारणाची कामे झालेल्या झालेल्या गट नं.१३९७ व १४०१ मधील भूसंपादनाच्या कार्यवाहीबाबतच्या विस्तृत माहितीचे एकूण ६ मुद्दे |

## विवेचन

'आवश्यक असलेली माहिती मिळालेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे', असे निवेदन श्री.भाऊसाहेब धोंडिबा गावडे यांनी राज्य माहिती आयोगाला दि.६/०४/२०१० रोजी सुनावणीच्या वेळी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 9 APR 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सतीश नारायण राक्षे
मु. पो. साळुंबे, ता. मावळ, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडगाव मावळ,
ता. मावळ, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
वडगाव मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८८ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सतीश नारायण राक्षे
मु. पो. साळुंबे, ता. मावळ, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडगाव मावळ,
ता. मावळ, जि. पुणे श्री. सचिन बारवकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
वडगाव मावळ, जि. पुणे श्री. संजय चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.९.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.१०.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.११.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ, यांनी दिलेली तहसीलदार, वडगाव मावळ यांच्या कार्यालयातील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ नुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती अपूर्ण वाटते. दि. ७.९.२००९ च्या अर्जावरील माहिती दि. ५.४.२०१० रोजी मिळाली. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडगाव मावळ यांनी अपिलाचा निर्णय दिला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सतीश नारायण राक्षे यांनी केली.

रिक्त पदे, अतिरिक्त कार्यभार, नैसर्गिक आपत्ती या कामांमुळे अपीलकर्त्यास माहिती देण्यास विलंब झाला. तथापि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१) व (ख) मधील तरतुदीनुसार सूचना फलकावर माहिती प्रसिध्द करण्यात आली असून अपीलकर्त्यास तसे सांगितले होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ श्री. राजेश चव्हाण यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडगाव मावळ यांनी त्याला दुजोरा दिला. तसेच अपिलाचा निर्णय विहित मुदतीत देऊन अपीलकर्त्यास टपालाने माहिती पाठविण्यात आली, असेही त्यांनी नमूद केले.

माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत व दंडात्मक कारवाईबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी लेखी खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ श्री. संजय चव्हाण यांनी दि. २३.४.२०१० च्या पत्रान्वये सविस्तर खुलासा सादर केला. मूळ कार्यभाराव्यतिरिक्त निवडणूक नायब तहसीलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार, विधानसभा निवडणूक विषयक कामकाज, नोव्हेंबर मध्ये मावळ तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीची १७७ गावांमधील पाहणी; पंचनामे व नुकसान भरपाईचे वाटप आदी बाबींमुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे श्री. चव्हाण यांनी खुलाशात नमूद केले असून ते मान्य करण्यात येत आहे. मात्र अपीलकर्त्याने मागितलेली माहिती सूचना फलकावर जाहीर केली गेलेली असताना व सरसकट स्वरुपात मागणी करणे योग्य नाही. अशा प्रकारच्या माहितीचे अवलोकन अपीलकर्त्यास करु देण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ यांना करता आली असती. अपीलकर्त्यास विहित मुदतीत लेखी स्वरूपात उत्तर दिले जाणे आवश्यक असल्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आपल्याला मिळालेल्या माहितीने आपले समाधान झाले असून अपील निकाली काढावे, असे अपीलकर्ता श्री. सतीश नारायण राक्षे यांनी दि. ३.४.२०१० रोजीच्या निवेदनात नमूद केले असून त्याची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी श्री. चव्हाण यांनी खुलाशासोबत सादर केली.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 27 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शमशुद्दीन हुसेन शेख मुजावर
ग्रामीण पोलीस अधिकारी निवासस्थान, राजगड, बी-४, चव्हाणनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा
तहसील कार्यालय आवार, हजेरी बंगला, पोवईनाका, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, वाई, ता.वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शमशुद्दीन हुसेन शेख मुजावर
ग्रामीण पोलीस अधिकारी निवासस्थान, राजगड, बी-४, चव्हाणनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा
तहसील कार्यालय आवार, हजेरी बंगला, पोवईनाका, जि.सातारा श्री.एस.वाय.भोसले

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,<br>भूमी अभिलेख, वाई, ता.वाई, जि.सातारा श्री.डी.बी.अर्जुन | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.६.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.११.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.११.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या जमिनीची मोजणी चुकीची करूनही त्याबाबतच्या तक्रारीची दखल घेतली नाही. एक वर्ष पाच महिन्यांनी माहिती दिली व मोजणी नकाशाची सहीशिक्क्याची प्रत दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शमशुद्दीन हुसेन शेख मुजावर यांनी केली.

सन १९९७ मध्ये झालेल्या मोजणीबाबत श्री.मुजावर यांनी तक्रार केली होती. सन १९९७ पासून तीन वेळा मोजणी करण्यात आली. पुराव्याचा नकाशा चुकीचा असल्याने प्रत्यक्ष जागेवर जाऊन तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी नकाशा करून दिला. मोजणीबाबत श्री.मुजावर यांची तक्रार असल्यास त्या संदर्भात नियमावलीनुसार योग्य ती प्रक्रिया अवलंबून त्याची दाद मागावी लागेल, याची कल्पना श्री.मुजावर यांना वेळोवेळी देण्यात आली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.एस.वाय.भोसले यांनी केले. जन

माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे **खंडपीठ,**
नवीन प्रशासकीय इमारत, **चौथा मजला,**
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.यशवंत शंकर रेडेकर
मु.पो.मनवाड
ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,
मनवाड वि.का.स.सेवा संस्था मर्या.,मनवाड,
ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०२.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे तर्फे श्री.एल.टी.भोसले<br>**जन माहिती अधिकारी तथा** सचिव, मनवाड वि.का.स.सेवा संस्था मर्या.,मनवाड, ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर श्री.रमेश भिमराव कलगोंडा | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.०३.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.०२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.यशवंत शंकर रेडेकर यांनी मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे सहाय्यक निबंधक, गडहिंग्लज यांनी अर्ज संस्थेकडे वर्ग करावयास हवा होता. तो केला नाही. संस्थेने अपीलकर्त्यास माहिती नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांनी दिले. अपीलकर्त्याने संस्थेकडे पत्रव्यवहारच केला नसल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्या आदेशानुसार रजिस्टर टपालाने दि.२३.०५.२००९ रोजी माहिती दिलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, मनवाड वि.का.स.सेवा संस्था मर्या.,मनवाड, ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर श्री.रमेश भिमराव कलगोंडा यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास माहिती दिल्याची रजिस्टर टपालाची पोच जन माहिती अधिकारी तथा सचिव, मनवाड वि.का.स.सेवा संस्था मर्या.,मनवाड, ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर श्री.रमेश भिमराव कलगोंडा यांनी आयोगास त्वरित सादर करावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. जितेंद्र हणमंतराव पवार ..... **अपीलकर्ता**
मु.पो.७६ शुक्रवार पेठ, (कोटेश्वर मैदाना समोर), सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ..... **उत्तरवादी**
सर्वे नं.४०९/६, ५१५/१ व २, सदर बाजार कॅम्प, सातारा-४१५ ००१

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्वे नं.४०९/६, ५१५/१ व २, सदर बाजार कॅम्प, सातारा-४१५ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९९/२००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक ०९.०४.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. जितेंद्र हणमंतराव पवार
मु.पो.७६ शुक्रवार पेठ, (कोटेश्वर मैदाना समोर), सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्वे नं.४०९/६, ५१५/१ व २, सदर बाजार कॅम्प, सातारा श्रीमती उ.कां.पवार

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्वे नं.४०९/६, ५१५/१ व २, सदर बाजार कॅम्प, सातारा श्री.एस.डी.आटोळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक २१.४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक २७.५.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २३.६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक ३०.१०.२००९ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पुर्ननियुक्तीच्या संदर्भात मागितलेली माहिती विलंबाने, दिशाभूल करणारी व खोटी दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.जितेंद्र हणमंतराव पवार यांनी केली.

अपीलकर्त्यास शुल्क कळविल्याच्या दुसऱ्याच दिवशी संबंधित नियमाच्या प्रतीसह सर्व माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, स.नं.४०९/६, ५१५/१ व २ सदर बाजार कॅम्प, सातारा यांच्या आदेशानुसार अपीलकर्त्यांना हवी असलेली अतिरिक्त माहिती प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) आणि कोल्हापूर, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली यांच्याकडून संकलित करून घेऊनही देऊ केली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, स.नं.४०९/६, ५१५/१ व २ सदर बाजार कॅम्प, सातारा श्रीमती यू.के.पवार व अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, स.नं.४०९/६, ५१५/१ व २ सदर बाजार कॅम्प, सातारा श्री.एस.डी.आटोळे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. या माहितीत खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती काय आहे, हे अपीलकर्ता सांगू शकले नाहीत. माहिती देण्यात आल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून व निवेदनांवरून दिसून येते. अधिक तपशील हवा असल्यास देण्याची तयारी असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, स.नं.४०९/६, ५१५/१ व २ सदर बाजार कॅम्प, सातारा यांनी नमूद केले. कार्यालयीन कामकाजाच्या संदर्भातील त्रुटी / गैरगोष्टी / सूचना या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विनोद बक्का वाघेला
दावणे गल्ली, कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल — उत्तरवादी
ता. कागल, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल
ता. कागल, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००० / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ७.४.२०१० |
| **३** | **उपस्थित -**<br>**अपीलकर्ता** - श्री. विनोद बक्का वाघेला<br>दावणे गल्ली, कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल<br>ता. कागल, जि. कोल्हापूर श्री. एन. व्ही. कल्याणकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.८.२००९, २९.९.२००९ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

शासकीय व गायरान जमिनीबाबत आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कागल, ता. कागल व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल, ता. कागल यांच्या पातळीवर मिळाली नाही. देऊ केलेल्या माहितीचे प्रत्येक प्रतीस रू.१०.१५ शुल्क

कळविले, हे शुल्क अवाजवी आहे. देऊ केलेली माहिती पाहिली असता आपल्या मागणीनुसार नसल्याचे आढळले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. विनोद बक्का वाघेला यांनी केली.

श्री. वाघेला यांनी सन १९८५ पासूनची व्यक्तिगत स्वरूपाची सरसकट माहिती मागितली आहे. त्यांचा अर्ज आला तो विधानसभा निवडणुकीचा काळ होता, त्यामुळे एकूण प्रतींचा अंदाज घेऊन शुल्क कळविण्यास विलंब झाला. कळविलेले शुल्क शासनाच्या प्रचलित नियमानुसार असलेले नक्कल शुल्क आहे. शुल्क भरल्यास माहिती देता येईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल, ता. कागल श्री. एन.व्ही. कल्याणकर यांनी केले.

अपीलकर्ता यांनी विस्तृत व ढोबळ मानाने सरसकट माहिती मागितली आहे. नकलेसाठी शासनाने शुल्क पूर्वनिधारित केले असल्यास त्यानुसार आकारणी करण्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ विषयक नियमानुसार मान्यता देण्यात आली आहे. तथापि शुल्क कळविण्यास विलंब झाला आहे, हे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार प्रतिपृष्ठ रू.२/- याप्रमाणे शुल्क आकारून अपीलकर्त्यास माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास शुल्क कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कागल, ता. कागल श्री. ए. ए. भाणसे यांनी दि. २१.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र — पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सखाराम गणपती शिंदे
सर्व्हे कॉलनी प्लॉट नं.१८,
'ए' वार्ड, राधानगरी रोड,
कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
करवीर, ता.करवीर,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
करवीर, ता.करवीर,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००१/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/०४/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७/१०/२००८ व १८/१०/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मूळ माहिती अर्ज (जोडपत्र-अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करवीर यांच्याकडे आपण मागितलेली माहिती उपलब्ध नसल्याची खात्री झाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्ता श्री. सखाराम गणपती शिंदे यांनी आयोगास दि.६/०४/२०१० च्या पत्रान्वये कळविले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 8 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.